**कौ.हिं.म.सं. अर्ज क्र. ७१/२०२३**

**निशाणी क्र.**

**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ सचिन सांबे यांचा सरतपास शपथेवर अर्जदारातर्फे श्रीमती. नेहा वाघ विधीज्ञ</u>**

शपथपत्रातील मजकूर मी वाचून पाहिला. तो माझे सांगणेप्रमाणे असुन त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास जाबदेणार तर्फे विधीज्ञ श्री. एस. डी. अरूडे यांचेमार्फत सुरू–</u>**

माझे शिक्षण बी. ई. इलेक्ट्रॉनिक्स व टेलीकम्युनिकेशन पर्यंत झालेले आहे. मी टेक्नीकल लीड म्हणुन कार्यरत आहे. मी टाटा कन्सलटन्सी सर्विसेसपुर्वी वच्युसा कन्सलटन्सी सर्विसेस येथे कार्यरत होतो. माझ्यासोबत माझी पत्नी, मुलगा व कधीकधी आई राहते. घर माझे स्वतःचे मालकीचे आहे. माझ्या घरावर कोणताही बोजा आहे. मी त्याचे हफते भरतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर उच्च वर्गीय सोसायटीमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा खर्च हा उच्च वर्ग सोसायटीसारखा आहे.

मी माझे शपथपत्र माझी मेव्हणीसाठी दाखल केले आहे. अर्जदार माझ्या घरी महिन्यात एक ते दोन वेळेस येतात. माझ्या लग्नापासुन त्यांचे येणे जाणे आहे. माझे लग्न सन २००७ मध्ये झाले आहे. तेव्हापासुन अर्जदार माझ्या घरी येतात. मी सन २००७ ते २०१० पर्यंत जयपुर येथे होतो. तेव्हा अर्जदार ही बडनेरावरून येत होती. मी बावधन येथे सन २०१९ मध्ये रहायला आलो. अर्जदार ही बी. ई. इन्सट्रमेंटेंशन पर्यत शिकली आहे. अर्जदाराला एक भाउ प्रणव बेले नावाचा आहे. तो बी.ई. सीव्हील पर्यंत शिकला आहे. माझी पत्नी सुशिक्षित आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या आधी

अर्जदार नोकरीला होती. हे म्हणणे खरे आहे की, आत्ता अर्जदाराचा भाउ नोकरीला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार ही तिच्या भावाकडे राहते.

मी मोर्शी जि. अमरावती येथे गेलो होतो.

प्रश्न – माझे असे म्हणणे आहे की, अर्जदाराच्या आई वडिलांचे मोर्शी जि. अमरावती येथे मोठे घर आहे ?

उत्तर – एक बेडरूमचे घर आहे.

हे मला माहिती नाही की, अर्जदाराच्या आई वडिलांकडे वडिलोपार्जित मालमत्ता आहे. मी माझ्या लग्नापासुन वर्षात दोन वेळेस मोर्शी जि. अमरावती येथे जातो. मी अमरावती येथे राहतो व अमरावतीपासुन मोर्शी हे ४५ कि.मी. च्या अंतरावर आहे.

मी जाबदेणार यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणारसोबत माझी ओळख अर्जदारांनी लग्नापुर्वी करून दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि. २२.०२.२०२३ रोजी जाबदेणार यांच्या भावाचे लग्न असल्याने जाबदेणार यांनी मला आमंत्रीत केले होते. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार यांच्या भावाचा विवाह बडनेरा जि. अमरावती येथे होता. मी जाबदेणार यांच्या भावाच्या लग्नात उपस्थित होतो तेव्हा अर्जदार सुध्दा उपस्थित होती. मी लग्नानंतर अमरावती येथे गेलो होतो. हे मला माहिती नाही की लग्नाच्या दोन दिवसानंतर अर्जदार ही तिचे माहेरी मोर्शी येथे गेली होती. हे मला माहिती नाही की, ती माहेरी दहा दिवस राहिली होती. त्या दहा दिवसात अर्जदार व जाबदेणारमध्ये काय घडामोडी झाली होती ते मला माहिती नाही.

हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२.०३.२०२३ रोजी सायंकाळी अर्जदाराने मला फोन केला होता. तिने मला सायंकाळी ५.३० ते ६.०० वाजताच्या दरम्यान फोन केला असेल. आमचे संभाषण दीड ते दोन मिनीटे झाले होते. तेव्हा माझे वर्क फ्रॉम होम चालू होते. हे म्हणणे खरे नाही की, दीड ते दोन मिनीटाच्या संभाषणानंतर माझा व अर्जदाराचा फोन झाला नाही. नंतर मी अर्जदारास फोन केला होता. किती वाजता केला

होता हे माझ्या लक्षात नाही. त्यानंतर त्याचदिवशी आमच्यामध्ये कोणताही फोन झाला नाही.

प्रश्न– माझे असे म्हणणे आहे की, त्याच्यानंतर तुम्ही जाबदेणार यांना फोन केला होता का ?

उत्तर – मी अर्जदार हिला फोन करण्याच्या आधी जाबदेणार याला फोन केला होता.

जाबदेणार हा अर्जदारास पुणे येथे आणायला तयार नव्हता. मी अर्जदारास कमीत कमी पुणे येथे आण असे म्हणत होतो. मी जाबदेणार यांना आणखी काही समजावले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०२.०३.२०२३ रोजी अर्जदार व जाबदेणार हे एकच रेल्वेतुन, एकाच डब्ब्यात पुणे येथे आले होते. हे म्हणणे खरे आहे की, रेल्वे ही पुणे येथे दि. ०३.०३.२०२३ रोजी सकाळी आली होती. मी रेल्वे स्टेशनवर गेल्यावर दोघांना समजावण्याचा प्रयत्न केला नाही. मी अर्जदार व तिचे भावाला माझे घरी घेवुन गेलो. तेव्हा आम्ही जाबदेणारविरूध्द पोलिस तक्रार केली नव्हती. मी अर्जदारास रेल्वे स्टेशनवरून आणायला गेलो तेव्हा तेथे असलेले पोलिस ठाण्यात मी तक्रार केली नव्हती. दि. ०३.०३.२०२३ ते दि. ०५.०३.२०२३ पर्यंत मी किंवा अर्जदाराने जाबदेणार विरूध्द कोणतीही तक्रार नोंदवली नव्हती.

विजय गायकवाड जाबदेणार यांचा मित्र आहे. मी दि. ०३.०३.२०२३ रोजी विजय गायकवाड याला भेटलो होतो तेव्हा आम्ही दि. ०५.०३.२०२३ रोजी बैठक घेवु असे ठरविले होते. तेव्हा विजय गायकवाड याने त्याचेच घरी येण्यासाठी सांगितले होते म्हणुन दि. ०५.०३.२०२३ रोजी बैठक झाली होती. हे मला आठवत नाही की, त्या बैठकीत अर्जदार हिने जाबदेणारास त्याचे भावाचे लग्नामध्ये किती खर्च केला होता याबाबत विचारणा केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या बैठकीत अर्जदार जोरजोरात ओरडुन बोलत होती की, मला घटस्फोट द्या मला अमेरिकेत जायचे नाही. हे मला आठवत नाही की, अर्जदार हिने तिचे टिकीट कॅन्सल करण्यासाठी सांगितले

होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या बैठकीत विजय गायकवाड याने अर्जदार हिने सहा महिने सासरी बडनेरा येथे राहण्याचा प्रस्ताव ठेवला होता. तो प्रस्ताव अर्जदाराने मान्य केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या बैठकीत अर्जदार हिने जाबदेणार विरूध्द केलेले आरोपांबाबत माफी मागितली होती. तदनंतर बैठक संपवली होती. साक्षीदार स्वतः सांगतो की, विजय गायकवाड याने मांडलेला प्रस्ताव जाबदेणार, त्याचे आई वडिल व आत्येभाउ याने फेटाळला होता. अर्जदार हिने जाबदेणार विरूध्द केलेले आरोपींबाबत माफी मागितली होती कारण जाबदेणार तिला सारखा सारखा घटस्फोटासाठी म्हणत होता. तेव्हा बैठकीत जाबदेणार याने दोनच आरोपी लावले होते, ते असे की अर्जदार ही त्यास उलट जबाब देते व पैशांचा हिशोब मागते.

मी अर्जदाराची कोणत्या तारखेला कशी अर्थीक मदत केली होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी किती वेळा अर्जदारास रक्कम दिली त्याची तारीख व वार मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार हिची कधी अर्थीक मदत केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही माझ्या पत्नीची बहिण असल्याने तिच्या सांगण्यावरून मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे मला माहिती नाही की, अर्जदार ही सध्या नोकरी करते. हे मला माहिती नाही की, त्यामुळे ती मागच्या दोन तारखेस कोर्टात आली नव्हती.

उलटतपास पुर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत

MAIMUNA SULTANA MOINUDDIN
Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN
Date: 2026.03.17 00:28:02 +0530

(कु.मैमुना सुल्ताना एम.)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी

दि. १६/०३/२०२६

समक्ष

MAIMUNA SULTANA MOINUDDIN
Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN
Date: 2026.03.17 00:28:07 +0530

(कु.मैमुना सुल्ताना एम.)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी

दि. १६/०३/२०२६